# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३

जा.क्र.:मका/कार्यक्रम/२०१६-१७/328        दिनांक : ६/४/२०१६

## परिपत्रक

### विषय :- मंडळाचा शिवणवर्ग-२०१६-२०१७

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या ज्या केंद्रात मान्यता देण्यात आलेली आहे अशा केंद्रामध्ये महिलांकरिता शिवणवर्ग खालील प्रमाणे दर्शविलेल्या सुचनांप्रमाणे आयोजित करण्यात यावा.

१. सदर वर्गात शिवण अभ्यासक्रम दरमहा पध्दतशीरपणे शिकविण्यांत यावा. प्रत्येक महिन्यासाठी नेमून दिलेला अभ्यासक्रम पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी संबंधित केंद्र महिला कल्याण सहाय्यिकेची/अर्धवेळ केंद्र उपसंचालिका यांची राहील.

२. माहे एप्रिल २०१६ पासून सुरु होणाऱ्या वर्गाकरिता प्रत्येक केंद्रातून कमीत कमी ३० महिलांना शिवण वर्गात प्रवेश देणे आवश्यक आहे.

३. प्रवेश नोंदणी करतांना कामगार कुंटूबिय महिलांना प्राधान्य द्यावे.एकूण प्रवेश नोंदणी संख्येच्या ५०% संख्या ही कामगार कुंटूबिय महिलांची असणे आवश्यक आहे. **ज्या केंद्रातील कर्मचारी शिवण वर्गात कामगार कुटूंबिय महिलांची नोंदणी करणार नाहीत त्या केंद्रामधील शिवण वर्ग बंद करण्यात येईल.**

४. शिवण वर्गात प्रवेश देताना सभासदाकडून प्रवेश फॉर्म भरुन घेण्यात यावा व फॉर्मवर सभासदाचा फोटो **लावण्यात यावा तसेच** ओळखीचा पुरावा म्हणून आधार कार्ड,मतदार ओळखपत्र ,पॅन कार्ड,वाहन परवाना,पासपोर्ट शाळा कॉलेजचे ओळखपत्राची किंवा अन्य ओळखपत्राची प्रत जोडण्यात यावी.वार्षिक शिवण शुल्क कामगार अथवा त्यांच्या कुटूंबियांकरिता रु.७५/-(रुपये पंच्याहत्तर) व इतरांकरिता रु.१५०/- (रुपये एकशे पन्नास) फक्त घेवून ते मंडळात भरावेत तसेच त्यांना केंद्रांचे रितसर सभासद करुन घ्यावे.

५. वार्षिक परिक्षेला कमीत कमी २५ विद्यार्थीनी बसणे आवश्यक आहे त्यापेक्षा कमी विद्यार्थीनी बसल्यास संबंधित शिक्षिकेला जबाबदार धरण्यात येईल.

६. माहे मार्च २०१७ महिन्याचा शेवटचा आठवडा किंवा एप्रिल २०१७ मध्ये पहिल्या आठवड्यात या वर्गाची वार्षिक परिक्षा घेण्यांत येईल. या वार्षिक परिक्षेकरिता छापील प्रश्नपत्रिका मुख्य कार्यालयांकडून संबंधित कामगार कल्याण अधिकारी यांचेकडे पाठविण्यांत येतील.उत्तीर्ण झालेल्या महिलांना मंडळातर्फे प्रमाणपत्र देण्यात येईल.

७ शिवण परिक्षेकरीता एकूण गुण २०० आहेत. प्रत्येक विद्यार्थीनीने एक मोठी वही तयार करुन त्यात अभ्यासक्रमाप्रमाणे शिकविण्यांत येणाऱ्या कपड्यांची थिअरी लिहीणे आवश्यक आहे. प्रत्येक महिन्यातील कपडे शिवून होताच संबंधित केंद्र महिला कल्याण सहायिकांनी / केंद्र उपसंचालिकांनी प्रात्यक्षिक वहींवर तपासणी केल्याचे शेरे द्यावेत. प्रात्यक्षिक वही वार्षिक परिक्षेच्यावेळी सादर करणे जरुरीचे आहे.

८. डिसेंबर २०१६ महिन्याच्या पहिल्या आठवडयात वार्षिक परीक्षा फी प्रत्येकी रु.२५/- प्रमाणे घेऊन विद्यार्थीनींच्या नावांची यादी सादर करावी.

९. वार्षिक परीक्षेला बसलेल्या विद्यार्थीनीची संख्या परीक्षा संपताच मध्यवर्ती कार्यालयास कळविण्यात यावी.वार्षिक परीक्षा घेतल्यानंतर उत्तर पत्रिका त्वरीत तपासून घेवून निकाल पत्राची एक प्रत मध्यवर्ती कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

१०. सभासद नोंदणी माहे एप्रिल २०१६ पासून सुरु करुन दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत पुर्ण करण्यात यावी. सभासद संख्या नोंदणीचा तपशिलासह अहवाल दिलेला तक्ता प्रमाणे दिनांक १५ सप्टेंबर २०१६ पर्यत मध्यवर्ती कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

| अ.क्र | विद्यार्थीनीचे नांव | वय | शिक्षण | पत्ता | पालकाचा व्यवसाय | कामगार/ का.कुटूंबिय/ कामगारेत्तर | प्रवेश नोंदणी दिनांक | वार्षिक शुल्क | पावती क्रमांक व दिनांक | सभासद क्रमांक व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

कल्याण आयुक्त.

प्रत,

१) सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय,ठाणे/मुंबई/नागपूर/नाशिक/पूणे/अकोला/का.क्रीडा भवन, मुंबई

२) प्रभारी सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय,औरंगाबाद,

३)कामगार विकास अधिकारी,नागपूर/अकोला

३) कामगार कल्याण अधिकारी (१८ गट कार्यालये). ★★★

४) सर्व केंद्र प्रमुख,सर्व केंद्रे

★★★ यांनी सदरचे परिपत्रक केंद्र प्रमुख व संबधित कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन द्यावे.